CMYK

'अटल' ऑनलाइन नोंदणी प्रणालीचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते उद्घाटन >> पान 2

लोकांच्या गरजा ओळखून उद्योग व्यवसाय करा >> पान 3

ई-महसूल प्रणालीचे क्यूआर कोड वापरुन ऑनलाईन सुविधांचा लाभ घ्यावा ! >> पान 4

**सुविचार**

मूल्यांची नीती नेहमी पालन करा, ते आपल्याला योग्य मार्ग दाखवतात.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034




सनी देओलनं सैनिकांबरोबर घालवला दिवस, आर्मी डे निमित्त वीरांना वाहिली श्रद्धांजली

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 155 ■ गुरूवार, दि. 16 जानेवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# भारताची मोठ्या सागरी शक्तीच्या दिशेने वाटचाल- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

## युद्धनौका, विनाशिका आणि पाणबुडी एकाच वेळी राष्ट्राला समर्पित

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : निलगिरी युद्धनौका, सूरत विनाशिका आणि वाघशीर पाणबुडीचे लोकार्पण ही नौदलाच्या गौरवशाली परंपरेला भविष्यातील आकांक्षेशी जोडणारी ऐतिहासिक घटना आहे. यामुळे भारताची वाटचाल मोठ्या सागरी शक्तीच्या दिशेने सुरू असून भारताच्या सुरक्षा आणि प्रगतीला मोठे सामर्थ्य प्राप्त झाले असल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितले.**









भारतात निर्मित सूरत आणि निलगिरी (युद्धनौका) तसेच वाघशीर (पाणबुडी) या तीन महत्वाच्या नौका मुंबईतील नेव्हल डॉकयार्ड येथे झालेल्या कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांच्या हस्ते राष्ट्राला समर्पित करण्यात आल्या. राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, नौसेना प्रमुख दिनेशकुमार त्रिपाठी यांच्यासह मान्यवर यावेळी उपस्थित होते.

प्रधानमंत्री श्री.मोदी म्हणाले की, संपूर्ण विश्र्व हा परिवार मानून भारत विकासाच्या भावनेने काम करतोय. तीन आघाडीच्या लढाऊ जहाजांचा नौदलामध्ये समावेश एक मजबूत आणि स्वावलंबी संरक्षण दल निर्माण करण्यासाठी भारताची अटल वचनबद्धता अधोरेखित करते. भारतीय समुद्र क्षेत्रात भारत प्रथम प्रतिसादकर्ता म्हणून उदयास आला आहे. नौदलाने अनेकांचे जीव वाचवले आहेत आणि राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मालवाहतूक सुरक्षित केली आहे. यामुळे जगभरातून भारतावर विश्र्वास वाढला असून आज जागतिक स्तरावर, विशेषत: 'ग्लोबल साउथ'मध्ये भारत एक विश्र्वासार्ह आणि जबाबदार भागीदार म्हणून ओळखला जातो. तीन युद्धनौकांचे राष्ट्रार्पण सैन्याबरोबरच आर्थिक दृष्टीने सुद्धा महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

जमीन, पाणी, हवा, खोल समुद्र किंवा अनंत अवकाश अशा सर्वच क्षेत्रात भारताने आपले हित जपून तिनही सेनादलांच्या माध्यमातून मागील काही वर्षात आत्मनिर्भर बनण्याची प्रशंसनीय वाटचाल सुरू ठेवली आहे. एकाच वेळी विनाशिका, युद्धनौका आणि पाणबुडी कार्यान्वित होत असल्याने छत्रपती शिवाजी महाराजांच्या पवित्र भूमीवर भारतीय नौदलाने स्वावलंबी होण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असल्याचे प्रधानमंत्री श्री.मोदी यांनी यावेळी नमूद केले. भारतीय सैनिकांना आता भारतीय युद्ध सामग्री उपलब्ध होत असून १०० हून अधिक देशांना संरक्षण सामग्री निर्यात केली जात आहे. या माध्यमातून 'मेक इन इंडिया' योजनेचा विस्तार होत असून आर्थिक प्रगतीचे दार उघडून भारताच्या तिसऱ्या मोठ्या अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करण्याच्या प्रक्रियेत मोठा हातभार लागत असल्याचे गौरवोद्गार प्रधानमंत्री श्री.मोदी यांनी काढले.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंग म्हणाले की, एकाच वेळी तीन युद्धनौका राष्ट्राला अर्पण होत असल्याने भारतीय समुद्री क्षेत्रात देशाची ताकद आणि महत्व वाढले आहे. या क्षेत्रातून मोठे व्यापार होत असून संरक्षण क्षेत्रात भारत आत्मनिर्भर होत आहे. आधुनिकीकरणावर भर देण्यात येत असून या तिनही नौका त्यादृष्टीने सक्षम असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

नौदल प्रमुख डमिरल श्री. त्रिपाठी यांनी नौदलासाठी गौरव आणि प्रतिष्ठेचा दिवस असल्याचे सांगून या निमित्ताने शक्ती, क्षमता आणि आत्मनिर्भरता साजरी केली जात असल्याचा उल्लेख केला.

### युद्धनौकांविषयी थोडक्यात

आयएनएस सूरत – हे प्रकल्पातील चौथे आणि अंतिम जहाज आहे असून जगातील सर्वात मोठ्या आणि अत्याधुनिक विनाशिकांपैकी एक आहे. या जहाजामध्ये ७५ टक्के स्वदेशी घटक असून यात अत्याधुनिक शस्त्र-संवेदक प्रणाली आणि प्रगत नेटवर्क-केंद्रित क्षमता आहेत.

आयएनएस वाघशीर – स्कॉर्पीन प्रकल्पातील ही सहावी आणि अंतिम पाणबुडी आहे. ही भारताच्या पाणबुडी बांधणीतील वाढत्या कौशल्याचे प्रतिनिधित्व करते. फ्रान्सच्या नेव्हल ग्रुपच्या सहकार्याने ही तयार करण्यात आली आहे.

आयएनएस निलगिरी – स्टेल्थ युद्धनौका प्रकल्पातील ही पहिली नौका आहे. भारतीय नौदलाच्या युद्धनौका डिझाईन ब्युरोने याचे डिझाइन केले आहे. यात टिकाऊपणा, समुद्रात स्थिरता आणि स्टेल्थसाठी प्रगत वैशिष्ट्ये आहेत, जी स्वदेशी युद्धनौकांच्या पुढील पिढीचे प्रतिबिंब आहे.

## एकदिवसीय सामन्यात १० शतके ठोकणारी पहिला भारतीय

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** आयर्लंडविरुद्धच्या या सामन्यात स्मृती मानधनाने तिच्या एकदिवसीय कारकिर्दीतील १० वे शतक झळकावले. या शतकासह ती एकदिवसीय क्रिकेटच्या इतिहासात १० शतके पूर्ण करणारी पहिली भारतीय महिला क्रिकेटपटू बनली आहे. ती भारतासाठी सर्वाधिक शतके करणारी महिला खेळाडू आहे. तिच्यानंतर माजी कर्णधार मिताली राजचे नाव यादीत आहे, जिने भारताकडून खेळताना ७ एकदिवसीय शतके झळकावली.

सर्वाधिक शतके करण्याचा विक्रम कोणाच्या नावावर?

महिलांच्या एकदिवसीय सामन्यात सर्वाधिक शतके करण्याचा विक्रम ऑस्ट्रेलियाच्या मेग लॅनिंगच्या नावावर आहे. लॅनिंगने १५ शतके केली आहेत तर सुझी बेट्सच्या नावावर १३ शतके आहेत. टॅमी ब्यूमोंट आणि स्मृती मानधना यांच्या नावावर प्रत्येकी १० शतके आहेत. श्रीलंकेच्या चामारी अटापट्टू, चार्लोट एडवर्ड्स आणि नॅट सेव्हेवर ब्रंट यांनी प्रत्येकी ९ एकदिवसीय शतके झळकावली आहेत.

## मुंबई-नाशिक महामार्गावर ५ वाहनांचा विचित्र अपघात; ३ ठार, १४ जखमी

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई-नाशिक महामार्गावरील शहापूर तालुक्यातील गोठेघरजवळ विचित्र अपघात झाला. अपघातात ३ जण ठार झाले आहेत. तर १४ जण जखमी झाले आहेत. हा भीषण अपघात आज पहाटे ३.५० च्या सुमारास घडला आहे.

शहापूर तालुक्यातील गोठेघरजवळ भरधावं वेगात जाणाऱ्या कंटेनरवरील चालकाचा ताबा सुटला. या कंटेनरनं भरधाव वेगात समोर असलेल्या ३ वाहनासह दुसऱ्या मार्गिकेवरील बसला जोरदार धडक दिली. या विचित्र अपघातातामधील १४ जखमींवर विविध रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या अपघात प्रकरणी शहापूर पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद करून पोलिसांनी तपास सुरू केला.

काही जणांची प्रकृती चिंताजनक- मिळालेल्या माहितीनुसार मुंबई-नाशिक महामार्गावरील शहापूर तालुक्यातील गोठेघरजवळ भरधाव वेगात कंटेनर जाताना चालकाचा ताबा सुटला. यावेळी कंटेनरनं समोर येणाऱ्या ट्रक, टेम्पो आणि बस इतर दोन वाहनानं जोरदार धडक दिली. या धडकेत २ महिला आणि पुरुषाचा मृत्यू झाला. १४ जखमींपैकी ८ जणांना ठाणे शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आलं. त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. तर ६ जणांवर शहापूर येथे उपचार सुरू आहेत.

# लाडकी बहीण योजनेतील अपात्र महिलांसाठी आर्थिक दंडाचे संकेत

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र सरकारची मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना खूप चर्चेत आहे. लाडकी बहीण योजना महायुतीच्या विजयासाठी गेम चेंजर ठरली. त्यांनतर आता या योजनेबाबत एक मोठी बातमी समोर येत आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून अपात्र महिलांना स्वत: हून नावे कमी करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असं सांगण्यात येत आहे.

महायुतीचं सरकार आल्यानंतर लाडकी बहीण योजनेत महिलांच्या अर्जाची तपासणी सुरु होणार असल्याची चर्चा होती. मात्र, फक्त तक्रारी आल्यास तुमच्या अर्जाची तपासणी केली जाईल, असं आदिती तटकरे यांनी सांगितलं होत. त्यांनतर आता महिला व बालकल्याण विभागाने याबाबत माहिती दिली आहे.लाडकी बहीण योजनेत निकषात न बसणाऱ्या महिलांना एकतर स्वत: हून नाव बाद करा किंवा पैसे भरावेत, असं सांगण्यात आलं आहे. अपात्र असलेल्या महिलांना योजनेतून नाव कमी करावे किंवा महिला व बालकल्याण विभागाच्या लेखाशिर्षावर पैसे भरावेत, अशी सूचना महिला व बालविकास विभागाचे सचिव अनुपकुमार यांनी केली आहे.

लाडकी बहीण योजनेत लाभार्थ्यांना डिसेंबर महिन्याचा हप्ता वितरीत करण्यात आला आहे. त्यानंतर आता जानेवारी महिन्याच्या हप्त्याची वाट महिला पाहत आहे.अशातच आता अपात्र लाडक्या बहिणींना स्वत: हून अर्ज बाद करण्यास सांगितले आहे. दरम्यान, आता ज्या महिला निकषात बसत नाही त्यांनी नाव मागे घ्यावेत किंवा ती रक्कम दंडासहित वसून केली जाईल, असं वक्तव्य छगन भुजबळांनी केले होते. त्यानंतर अपात्र लाडक्या बहिणींना दंड भरावा लागणार असल्याची चर्चा सुरु होती.याआधी धुळ्यातील आणि पुण्यातील दोन महिलांनी अर्ज स्वत: हून बाद केले आहे.

# काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदासाठी कदम, देशमुख, ठाकूर यांच्या नावांची चर्चा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भाजपच्या प्रदेशाध्यपदाच्या बदलानंतर आता काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदाकडे सर्वांचं लक्ष्य लागलं आहे. काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदावरून नाना पटोले पायउतार होणार असून, नव्या प्रदेशाध्यक्षपदासाठी अनेक नेत्यांची नावे चर्चेत आहेत, तर या पदासाठी तरुण चेहऱ्याला पक्ष संधी देणार का असेल, अशी चर्चा काँग्रेस पक्षात रंगली आहे. विश्वजीत कदम, माजी मंत्री यशोमती ठाकूर आणि माजी मंत्री अमित देशमुख यांची नावे या पदासाठी चांगलीच चर्चेत आहेत. लवकरच याबाबत निर्णय होण्याची शक्यता आहे. विधानसभा अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर नाना पटोले यांची प्रदेशाध्यक्ष पदी वर्णी लागली होती. त्यांच्या प्रदेशाध्यक्षपदाच्या कारकिर्दीला आता चार वर्षे झाली आहेत.

त्यांच्या प्रदेशाध्यक्ष पदाच्या कारकिर्दीमध्ये काँग्रेसने लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात मोठं यश मिळावलं. मात्र, विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला मोठ्या पराभवाचा सामना करावा लागला. यामुळे पटोले यांना हटवण्याची मागणी पक्षातून केली जात आहे. काँग्रेस पक्षश्रेष्ठींकडून नव्या प्रदेशाध्यक्षपदासाठी तरुण नेत्यांची चाचपणी सुरू असल्याची चर्चा आहे. पक्षामध्ये पुन्हा उत्साह निर्माण करेल, अशा नेतृत्वाच्या शोधात काँग्रेस असल्याची चर्चा आहे. त्यामुळे बाळासाहेब थोरात, पृथ्वीराज चव्हाण, विजय वडेट्टीवार यासह वरिष्ठ नेत्याच्या नावांच्या चर्चा असतानाच आता पुन्हा एकदा पदासाठी नेमकी कोणाची वर्णी लागणार ते पाहणं महत्वाचं ठरणार आहे. प्रदेशाध्यक्ष पदासाठी यशोमती ठाकूर यांचं देखील नाव विदर्भातून पुढे चर्चेत येत आहे. विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने विदर्भात आधिक जागा जिंकल्या आहेत. लोकसभेत काँग्रेसला विदर्भामध्ये चांगलं यश मिळालं. विदर्भातून नाना पटोले आणि विजय वडेट्टीवार यांचं नाव विधिमंडळ गटनेतेपदासाठी चर्चेत आहे. पटोले किंवा वडेट्टीवार यांच्यापैकी कोणालाही विधिमंडळ गटनेते बनवले तर प्रदेशाध्यक्षपद मराठवाड्याकडे किंवा पश्चिम महाराष्ट्राकडे जावू शकते, अशी चर्चा आहे.

अमित देशमुख यांना प्रदेशाध्यपद देण्यासाठी पटोले आग्रही आहेत. सतेज पाटील यांच्या नावाची देखील चर्चा आहे. जुलैमध्ये विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची मुदत संपत आहे. त्यामुळे काँग्रेसकडे विरोधी पक्षनेतेपद येईल. त्यासाठी देखील सतेज पाटील यांच्या नावाची चर्चा आहे. विश्वजीत कदम यांचे नाव देखील चर्चेत आहे. पक्षातील तरुण नेते स्वतःहून हे पद घेण्यास इच्छुक नाहीत, असंही म्हटलं जातंय. त्यामुळे पक्षातील बडे नेते किंवा तरूण नेते यांच्यापैकी कोणी स्वतःहून हे पद घेण्यास उत्सुक नसल्याचं चित्र आहे, मात्र, पक्षाने दिले तर ही जबाबदारी घ्यावी लागेल, असे या नेत्यांचे म्हणणे आहे.

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी या होणाऱ्या नावांच्या चर्चेबाबत बोलताना म्हटलं, होणाऱ्या चर्चांवर माझं नाव प्रदेशाध्यक्ष पदासाठी नाही. या महिन्यात नवा प्रदेशाध्यक्ष मिळेल की नाही हे मला माहीत नाही, असंही ते पुढे म्हणाले आहेत.

# वाल्मीक कराडला ७ दिवसांची एसआयटी कोठडी

## हत्येच्या सहभागाची होणार चौकशी; जिल्हा न्यायालय परिसरात समर्थक, विरोधकांची घोषणाबाजी

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणाच्या चौकशीसाठी वाल्मिक कराडच्या पोलीस कोठडीची मागणी एसआयटी पथकाने केली होती. त्यानुसार, बीड सत्र न्यायलायाने मकोका गुन्ह्यातील आरोपी वाल्मिक कराडला ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. त्यानंतर, आरोपी कराडला कोर्टातून पोलीस व्हॅनमध्ये नेत असताना कोर्टाबाहेर चांगलाच राडा पाहायला मिळाला. वाल्मिक कराडच्या समर्थनार्थ अनेकांनी घोषणाबाजी केली, तर काहींनी वाल्मिक कराडला विरोधाही घोषणाबाजी केली. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या महिला कार्यकर्त्या ॲड. हेमा पिंपळे यांनी घोषणाबाजी करत गृहमंत्र्यांनी बीड जिल्ह्यात यावं, असं म्हटलं. तर, काही वकिलांनीही संविधानाचा दाखला देत वाल्मिक कराडवर चुकीच्या पद्धतीने गुन्हे दाखल करण्यात आल्याचं म्हटलंय. त्यामुळे, बीडच्या कोर्टाबाहेरच राडा पाहायला मिळाला.

बीड सत्र न्यायालयाने वाल्किम कराडला ७ दिवसांची एसआयटी कोठडी सुनावली असून २२ जानेवारीपर्यंत पीसीआर देण्यात आली आहे. न्यायालयातील सुनावणीनंतर एसआयटी पथकाने वाल्मिक कराडला न्यायालयातून बाहेर आणल्यानंतर कोर्टाबाहेर राडा झाल्याचं पाहायला मिळालं. कोर्टाबाहेर वकिलांचेच दोन गट दिसून आले, त्यापैकी एका महिला वकिलाने वाल्मिक कराडवर आरोप करत फाशीची शिक्षा द्या म्हणत घोषणाबाजी केली. तर, एका वकिलाने वाल्मिक कराड यांच्यावर चुकीच्या पद्धतीने गुन्हे दाखल केल्याचं म्हणत त्यांचे समर्थन केले, तसेच आंदोलनाच्या माध्यमातून दबाव टाकला जात असल्याचं म्हटलं. त्यानंतर, पोलीस व इतर सुरक्षा रक्षकांनी संबंधित आंदोलकांना ताब्यात घेतल्याचं पाहायला मिळालं.

दरम्यान, आज न्यायालयाती वाल्मिक कराडच्या मकोका गुन्ह्यासंदर्भात सुनावणी झाली. त्यामध्ये बीडमधील सरपंच संतोष देशमुखची ९ डिसेंबर रोजी हत्या झाली, त्यादिवशी दुपारी ३.२० ते ३.३० दरम्यान १० मिनिटांच्या कालावधीत सुदर्शन घुले, विष्णू चाटे आणि वाल्मिक कराड यांचे फोनवरून एकमेकांशी संभाषण झाल्याची माहिती SIT ने कोर्टात दिली आहे. या तिघांमध्ये त्या दिवशी नेमकं काय बोलणं झालं याचा तपास करायचा आहे. त्यामुळे वाल्मिक कराडच्या १० दिवसांच्या कस्टडीची मागणी ड्खढ तर्फे करण्यात आली होती. संतोष देशमुख यांच्या अपहरणाची वेळ आणि या तिघांच्या फोनवरील संभाषणाची वेळ मिळतीजुळती असल्याचंही एसआयटीने म्हटलं.

विशेष म्हणजे ९ डिसेंबर रोजीच दुपारी ३ ते ३.१५ दरम्यान संतोष देशमुख यांचे अपहरण झालेलं होतं. त्याच वेळेच्या जवळपासच तिघांमध्ये फोन कॉल झाल्याचे रेकॉर्डवरुन दिसत असल्याचे एसआयटीने म्हटलं आहे. तसेच, वाल्मिक कराडवर या आधी दाखल झालेले गुन्ह्यांची यादी कोर्टात सरकारी पक्षाकडून सादर केली. इतर आरोपीविरोधातही दाखल गुन्ह्यांची माहिती दिली. वाल्मिक कराडवर चउजउ- कसा लावण्यात आला, याचा संदर्भही देण्यात आला आहे. दरम्यान, वाल्मिकने हत्येच्या दिवशीही संतोष देशमुखांना धमकी दिल्याचा दावा एसआयटीने केला आहे. वाल्मिकच्या पोलीस कोठडीसाठी एसआयटीने ९ ते १० ग्राउंडस न्यायालयात मांडले. कोर्टातला हा संपूर्ण युक्तिवाद इन कॅमेरा झाला आहे.



वाल्मिक कराडच्या विदेशातील मालमत्तेबाबत चौकशी सुरू आहे. विष्णू चाटे, सुदर्शन घुले आणि कराड यांमध्ये इंटरलिंक काय आहेत? याचा तपास सुरू आहे. तसेच, फरार आरोपी अजून सापडायचा आहे. फरार कृष्णा आंधळेला लपवण्यात यांचा हात आहे का? याची माहिती घ्यायची आहे. घुले आणि चाटे अनेक दिवस फरार होते, त्यांना कोणी मदत केली? याची माहिती घेणं सुरू आहे. त्यामुळे, आरोपीला १० दिवसांची पोलीस कोठडी द्या, अशी मागणी सरकारी वकिलाने न्यायालयात केली होती.

खुनाच्या प्रकरणातील कुठल्याही आरोपीने वाल्मिक कराडचे नाव घेतले नाही. वाल्मिक कराड विरोधात कुठलाही ठोस पुरावा नाही. त्यामुळे, वाल्मिक कराडवर हत्येचा गुन्हा लागू होऊ शकत नाही. वाल्मिक कराड यांची अटक बेकायदेशीर आहे, असे वाल्मिक कराडचे वकिल सिद्धेश्वर ठोंबरे यांनी न्यायालयात म्हटले.

CMYK

# 'अटल' ऑनलाइन नोंदणी प्रणालीचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

## आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून विद्यार्थ्यांनमध्ये आत्मविश्वास वाढविण्यासाठी 'अटल' उपक्रम : उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** शिक्षणातील संधी आणि क्षमता ओळखण्याबरोबरच विद्यार्थ्यांनमधील आत्मविश्र्वास वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून 'अटल' उपक्रम सुरू करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना राज्य सामाईक प्रवेश कक्षाकडून घेण्यात येणाऱ्या विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी परीक्षांचा सराव करता यावा म्हणून हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.हा उपक्रम विद्यार्थ्यांनमध्ये आत्मविश्र्वास वाढविण्यासाठी उपयुक्त ठरेल, असे प्रतिपादन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी केले.



आज उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या हस्ते महाराष्ट्र राज्य सीईटी सेलकडून सुरू करण्यात आलेल्या ATAL ( Assessment, Tests And Leaning ) ऑनलाइन नोंदणी प्रणालीचे उदघाटन करण्यात आले. यावेळी राज्य सामाईक परीक्षा कक्षाचे आयुक्त दिलीप सरदेसाई, सीईटी सेलचे घनश्याम केदार व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री. पाटील म्हणाले, या उपक्रमाअंतर्गत मॉक टेस्ट्स आणि सायकोमेट्रिक टेस्टच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमतांचा शोध घेता येणार आहे. या सराव परिक्षांमुळे विद्यार्थ्यांनमधील आत्मविश्र्वास वाढण्यास मदत होणार आहे. त्याचबरोबर त्या विषयातील शैक्षणिक संधी आणि प्रवेश परीक्षांच्या पूर्वतयारीमुळे विद्यार्थ्यांना परीक्षेला सामोरे जाताना येणारा ताण कमी होईल आणि शैक्षणिक आयुष्यात पुढे जाण्यास प्रोत्साहन मिळेल. सायकोमेट्रिक टेस्टद्वारे विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार व त्यांच्या क्षमतांनुसार योग्य शैक्षणिक आणि व्यावसायिक विषयांची निवड करण्यास मदत होईल. हा उपक्रम हे केवळ परीक्षा तयारीपुरते मर्यादित नसून, विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रोत्साहन देणारा आहे.असेही मंत्री श्री. पाटील यांनी यावेळी सांगितले.

अधिक माहितीसाठी :https:// cetcell.mahacet.org यावर माहिती उपलब्ध आहे.

## सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करणे हाच वाहतूक कोंडीवरील उपाय

पुणे शहरातील वाहतूक व्यवस्था दिवसेंदिवस जटील होत चालली आहे. शहरातील मध्यभाग, उपनगर, पेठांसह बस स्थानक, रेल्वे स्थानक परिसरात प्रचंड वाहतूक कोंडी वाढली आहे. या ठिकाणांहून वाहन चालकांना मार्ग काढणे, आणि नागरिकांना चालणे देखील मुश्किल झाले आहे. पुण्यातील वाहतूक कोंडीने दररोज पुणेकरांना जीव मुठीत धरावा लागत आहे. त्यामुळे पुणेकर अक्षरशः वैतागले असून पुण्यातील या वाहतूक कोंडीत पुणेकरांचा श्र्वास घुसमटत आहे. पुण्यातील वाहतूक कोंडीवर आता जगाने ही शिक्कामोर्तब केले आहे. टॉम टॉम या जागतिक संस्थेने जगातील ६२ देश आणि ५०० शहरांमधील रहदारीची माहिती संकलन करून ट्रॉफीक इंडेक्स २०२४ नावाचा अहवाल सादर केला. या अहवालात जगातील सर्वाधिक वाहतूक कोंडी असलेल्या शहरांची नावे प्रसिद्ध करण्यात आली आहे. या अहवालात जगातील सर्वाधिक वाहतूक कोंडी असलेल्या पाच शहरांमध्ये कोलाकोता, बेंगळुरू आणि पुणे या शहरांचा समावेश आहे. या अहवालात सर्वाधिक वाहतूक कोंडी असलेल्या शहरात कोलकाता दुसऱ्या तर पुण्याचा चौथा क्रमांक लागत असल्याचे नमूद केले आहे. जगातील सर्वाधिक वाहतूक कोंडी असलेल्या शहरात पुण्याचा चौथा क्रमांक लागतो ही पुणेकरांसाठी भूषणावह बाब नसून चिंताजनक बाब आहे. पुण्यातील वाहतूक कोंडी दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. दहा किलोमीटरच्या प्रवासासाठी पुणेकरांना ३३ मिनिटे २२ सेकंद लागतात. पुणेकरांचा सर्वाधिक वेळ हा प्रवासातच जातो. पुण्यातील वाढत्या वाहतूक कोंडीला अनेक कारणे आहेत त्यातील सर्वात महत्वाचे कारण म्हणजे वाहनांची बेसुमार वाढती संख्या. एकेकाळी सायकलींचे शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यात आज लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे दरवर्षी त्यात भरच पडत आहे. वाढत्या वाहनांमुळे रस्ते अपुरे पडत आहे. अरुंद रस्ते आणि त्यावर फोफावलेली अतिक्रमणे यामुळे पुण्यातील वाहतूक कोंडीत भरच पडत आहे. पुण्यातील वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी साधारणपणे एक हजार वाहतूक पोलीस रस्त्यावर असतात. पुणे शहराचा विस्तार मुंबईपेक्षा जास्त आहे. वाहतूक पोलिसांना उपलब्ध मनुष्यबळात काम करावे लागते. वाहतूक कोंडीला पोलिसांना दोषी ठरवले जाते. मात्र यात पोलिसांचा काहीही दोष नाही. पुण्यातील वाहतूक कोंडी रोखायची असेल वाढत्या वाहनांना आळा घालवा लागेल आणि वाढत्या वाहनांना आळा घालायचा असेल तर पुण्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करावी लागेल. जर पुण्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाली तर लोक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचाच वापर करतील त्यामुळे वाढत्या वाहनांना आळा बसेल आणि वाढत्या वाहनांना आळा बसला की वाहतूक कोंडीही कमी होईल आणि वाहतूक कोंडी कमी झाली की पुणेकरांना मोकळा श्वास घेता येईल.

## मंत्री नितेश राणेंची सिंधुदुर्गात प्राणीसंग्रहालयाची मागणी

**मुंबई/प्रतिनिधी :** मत्स्य व्यवसाय व बंदर विकास मंत्री नितेश राणे यांनी वनमंत्री गणेश नाईक यांची भेट घेतली. याप्रसंगी मंत्री नितेश राणे यांनी वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे सिंधुदुर्ग जिल्ह्यात प्राणीसंग्रहालय उभारण्याची मागणी केली. सिंधुदुर्ग जिल्ह्याला मोठा समुद्र किनारा लाभल्यामुळे जिल्ह्यात पर्यटकांचा ओघ आहे.जिल्ह्याच्या एका बाजूला समुद्र किनारा तर दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या पर्वत रांगा आणि जंगल आहे.सिंधुदुर्गातील जंगलात अनेक प्रकारचे वन्यप्राणी व विविध जाती प्रजातीचे पक्षी आढळून येतात. जिल्ह्यात प्राणीसंग्रहालय निर्माण झाल्यास पर्यटकांचा ओघ वाढेल.त्यामुळे स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.प्राणी संग्रहालय झाल्यास जिल्ह्याच्या दरडोई उत्पन्नात वाढ होऊन जिल्हावासीयांचे जीवनमान उंचावण्यास मदत होईल.याचा निवेदनात उल्लेख करून मंत्री नितेश राणे यांनी प्राणीसंग्रहालयाची मागणी केली आहे. प्राणी संग्रहालयाला लागणारी आवश्यक जागा सिंधुदुर्गात उपलब्ध असून संबंधितांना मंजुरीसाठी आदेश देण्याची विनंती मंत्री नितेश राणे यांनी वनमंर्त्याजवळ केली.

## मुंबई हादरली! १७ वर्षीय मुलाचा महिलेवर घरात घुसून बलात्कार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मानखुर्द मध्ये अल्पवयीन मुलाने महिलेवर बलात्कार केल्याच्या घटनेनं एकच खळबळ माजली आहे. उपलब्ध माहितीनुसार मुंबईतील मानखुर्द येथे १७ वर्षीय अल्पवयीन मुलाने केला २७ वर्षीय म हिलेला चाकूचा धाक दाखवून तिच्यावर अत्याचार केल्याची घटना घडली.

सदर प्रकरणाची माहिती मिळताच मानखुर्द पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतलं असून त्याला बालसुधारगृहात पाठवण्यात आलं आहे. ही घटना गेल्या सोमवारी दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास घडली. गृहिणी असलेली ही महिला तिच्या दोन मुलांसह घराच्या दरवाजाजवळ बसली होती, तर तिचा पती कामावर गेला होता.

या महिलेच्या हालचालींवर लक्ष ठेवून असलेल्या आरोपीने तिच्या घरात घुसून दरवाजा आतून बंद केला आणि चाकूचा धाक दाखवला. महिलेने प्रतिकार केल्यास तिला, तिच्या मुलांना जीवे मारण्याची धमकी आरोपीने दिली. त्यानंतर त्याने घराबाहेर पडताना दरवाजा बाहेरून बंद केला आणि घटनास्थळावरून पळ काढला.



आरोपी तिथून निघताक्षणी महिलेने मदतीसाठी आरडाओरडा केला. हे ऐकून शेजाऱ्यांनी धाव घेऊन दरवाजा उघडला. तिच्या पतीला घडलेला प्रसंग सांगून पोलिसांना याप्रकरणाची माहिती देण्यात आली. पीडितेच्या जबाबानंतर याप्रकरणी बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आणि संशयिताचा शोध घेण्यासाठी आठ पोलिस पथकं तयार करण्यात आली .

आरोपी, हा स्थानिक रहिवासी असून घटनेपासून फरार होता. त्यानं आपला फोनही बंद ठेवला होता. तो स्वत:च्या घरी येण्यास टाळत होता. सोमवारी रात्रभर शोध घेतल्यानंतर मंगळवारी दुपारी अखेर त्याला अटक करण्यात आली. आरोपी अल्पवयीन आहे की नाही याची पुष्टी करण्यासाठी पोलीस त्याच्या जन्माचा दाखला आणि इतर कागदपत्रांची पडताळणी करत आहेत. दरम्यान, वय पडताळणीच्या निकालाच्या आधारे पुढील कारवाई निश्चित केली जाईल अशी माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिली.

## 'दिलखुलास', 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात लीना बनसोड यांची मुलाखत



**मुंबई/प्रतिनिधी :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' आणि 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक लीना बनसोड यांच्या विशेष मुलाखतीचे प्रसारण होणार आहे.

'दिलखुलास' कार्यक्रमात ही मुलाखत सोमवार दि. २०, मंगळवार दि.२१, बुधवार दि. २२ आणि गुरूवार दि. २३ जानेवारी २०२५ रोजी आकाशवाणीच्या सर्व केंद्रावरून व न्यूज ऑन एआयआर'या मोबाईल ॲपवर सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित होणार आहे. तर 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात ही मुलाखत मंगळवार दि. २१ जानेवारी २०२५ रोजी रात्री ८.०० वा. दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर प्रसारित होणार आहे. तसेच महासंचालनालयाच्या समाजमाध्यमांच्या पुढील लिंकवर ही मुलाखत ऐकता येणार आहे. ज्येष्ठ निवेदक प्रसाद मोकाशी यांनी ही मुलाखत घेतली आहे.

## सनी देओलनं सैनिकांबरोबर घालवला दिवस, आर्मी डे निमित्त वीरांना वाहिली श्रद्धांजली

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूड स्टार सनी देओलनं १५ जानेवीर रोजी लष्कर दिन साजरा केला आणि भारतीय सैन्याच्या शौर्याला. धैर्याला, त्यागाला आणि समर्पणाला भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. लष्कार दिनाच्या निमित्तानं आयोजित केलेल्या सैन्याच्या कार्यक्रमात सनीनं भाग घेतला. आपला वेळ सैनिकांबरोबर घालवताना त्यानं देशाच्या रक्षकांच्या शौर्याला सलाम केला. सनी देओलनं इंस्टाग्रामवर त्यांच्या भेटीचे अनेक व्हिडिओ आणि फोटो शेअर केलो आहेत. एका व्हिडिओमध्ये, सनी आणि सैनिक ''भारत माता की जय'' अशा घोषणा देताना दिसतात.

इतर काही फोटोत तो सैनिकांच्या बरोबर संवाद साधताना, त्याच्याशी मजा मस्ती करताना दिसत आहे. या भेटीत त्यानं जवानांबरोबर फोटो काढले आणि कुस्तीही खेळली. या फोटोंच्या कॅप्शनमध्ये त्यानं लिहिलं, ''तेव्हा, आता आणि कायमचे. आपल्या वीरांच्या धैर्याला, त्यागाला आणि अढळ समर्पणाला सलाम. भारतीय सैन्य दिनाच्या शुभेच्छा! हिंदुस्तान जिंदाबाद.''

भारतीय सैन्यासाठी हा एक अतिशय महत्त्वाचा दिवस आहे. या वर्षी भारतीय सैन्याच्या वतीनं ७७ वा सैन्य दिन साजरा करण्यात आला. या समारंभाला सनी देओल पाहुणा म्हणून आल्यानं जवानांना आनंदा झाल्याचं पाहायला मिळालं.

कामाच्या आघाडीवर सनी देओल त्याच्या बहुप्रतिक्षित 'बॉर्डर २' चित्रपटाच्या प्रदर्शनाची तयारी करत आहे. जानेवारी २०२६ मध्ये प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटात दिलजीत दोसांझ, वरुण धवन आणि अहान शेट्टी यांच्यासह अनेक कलाकार दिसतील. अनुराग सिंग दिग्दर्शित १९९७ म ध्ये गाजलेल्या आयकॉनिक बॉर्डर चित्रपटाचा हा सिक्वेल आहे. यामध्ये सनी देओल पुन्हा एकदा त्याच्या भूमिकेत दिसणार आहे. हा चित्रपट प्रेक्षकांना ॲक्शन-पॅक्ड, देशभक्तीपर सिनेमॅटिक अनुभव देणारा असेल.

## विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांची जपानच्या महावाणिज्यदूतांनी घेतली सदिच्छा भेट



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** जपानचे भारतातील महावाणिज्यदूत यागी कोजी यांनी आज विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांची सदिच्छा भेट घेतली. सभापती पदी निवड झाल्याबद्दल श्री. कोजी यांनी प्रा. शिंदे यांचे अभिनंदन केले.

सभापती प्रा. राम शिंदे यांनी महावाणिज्यदूत श्री. कोजी यांचे स्वागत केले. यावेळी विधिमंडळाचे सचिव (कार्यभार २) विलास आठवले उपस्थित होते.

जपान भारत यांचे मैत्रीचे संबंध आहेत. महाराष्ट्रासारख्या प्रगतीशील राज्यामध्ये विविध पायाभूत प्रकल्पांमध्ये जपान सहभागी असल्याचा आपल्याला आनंद आणि अभिमान असल्याचे श्री. कोजी यांनी यावेळी सांगितले. तसेच मेट्रोच्या उभारणीत जपान संपूर्ण सहकार्य करीत असून लवकरच ते काम पूर्णत्वास येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

प्रा. शिंदे यांनी पर्यटन मंत्री असताना एप्रिल २०१६ मध्ये दिलेल्या जपान भेटींना उजाळा दिला. त्यावेळी प्रा. शिंदे यांनी याकोहामा मधील कोयासान विद्यापीठात दिलेल्या भाषणांची आठवण सांगितली. तसेच जपानच्या सहकार्याबद्दल आनंद व्यक्त केला.

# जालन्यातील जिल्हा स्त्री रुग्णालयात झालेल्या चोरीच्या प्रयत्नात चार लाखांचे नुकसान


दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** जालन्यातील जिल्हा स्त्री रुग्णालयातील सोलार वॉटर हीटरचे २६ ट्यूब लाईट फोडून चोरी करणाऱ्या दोन आरोपींपैकी एकाला कदीम पोलिसांनी जेरबंद केलं आहे तर दुसरा आरोपी फरार आहे.१४ जानेवारी रोजी रात्री साडे नऊ वाजता जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या गच्चीवर पाणी गरम करण्यासाठी वापरण्यात येणारे सोलार वॉटर हीटर ट्यूब लाईट आणि साहित्य चोरी करण्याचा प्रयत्न झाला. या वॉटर हीटरच्या पाईप मध्ये तांबा हा धातू असून या तांब्याची चोरी करण्यासाठी २ अज्ञात

### जिल्हा स्त्री रुग्णालय अधीक्षक डॉ.एस.जी. गवारेंची माहिती

चोरटे जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या गच्चीवर गेले होते. त्या दरम्यान दोन चोरट्यांनी सोलार वॉटर हीटरचे २६ ट्यूब लाईट फोडले. साहित्य चोरण्याचा प्रयत्नात असणाऱ्या याद दोघांना गस्तीवर असलेल्या जिल्हा स्त्री रुग्णालयातील सुरक्षा रक्षकाने पाहिले. त्याच वेळी सुरक्षा रक्षक आणि चोरट्यामध्ये झटापट झाली. सुरक्षारक्षकाने एका चोरट्यास पकडले





तर दुसरा चोराने धूम ठोकली. तात्काळ सुरक्षा रक्षकाने हा सर्व प्रकार प्रशासनाला सांगितला त्यानंतर त्यांनी ११२ नंबरवर फोन करून पोलिसांना कळवले. घटनेची माहिती मिळताच कदिम जालना पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन घटनेचा पंचनामा केला. सुरक्षारक्षकाने पकडलेल्या एका चोरट्याला कदीम जालना पोलिसांच्या ताब्यात दिले. कदिम जालना पोलिसांत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. या चोरी प्रकरणी अंदाजे चार लाखाचं नुकसान झाले असल्याची माहिती जिल्हा स्त्री रुग्णालय अधीक्षक डॉ एस. जी. गवारे यांनी दिली आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### ठाणे रेल्वे स्टेशनसमोर भाजपच्या वतीने राबविण्यात आली सदस्यता नोंदणी मोहिम




दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी** :राज्यात नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत ठाणे जिल्ह्यात भाजपाने घवघवीत यश मिळवले. ठाणे जिल्ह्यात भाजपचे ९ आमदार निवडून आले आहेत. तर दुसरीकडे नुकत्याच शिर्डी येथे पार पडलेल्या भाजपाच्या महाअधिवेशनात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये यश मिळवण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागण्याचे संकेत भाजप श्रेष्ठींनी दिले होते. या पार्श्र्वभूमीवर भाजपा ठाणे शहर जिल्ह्याच्या वतीने आज ठाणे रेल्वे स्टेशनसमोर भाजपा सदस्यता नोंदणी अभियान शिबीरराबविण्यात आले. या अभियानांतर्गत सुमारे १००० नागरिकांनीभाजपाचे सदस्य करून घेण्यात आले. यावेळी ठाणे शहर जिल्हाध्यक्ष संजय वाघुले, भाजप महिला मोर्चा अध्यक्षास्नेहा पाटील, नौपाडा महिला अध्यक्षा वृषाली वाघुले, सागर भदे, विकास घांग्रेकर, रोहित गोसावी यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### अंबड शहरातून अपहरण झालेल्या तीन वर्षीय मुलीचा शोध सुरु; पोलीस निरीक्षक अमोल गुरले यांची माहिती



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी** : १२ जानेवारी २०२५ रोजी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास घरासमोर खेळत असलेल्या तीन वर्षीय ईकारा अमजद शेख राहणार फैसलाबाद कॉलनी तालुका अंबड या मुलीचे कोणीतरी ती घरासमोर खेळत असताना अपहरण केले. सदर प्रकरणात मुलीच्या वडिलांनी अंबड पोलीस ठाण्यात मुलीचे अपहरणाची तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीवरून पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांच्या आदेशावरून पोलिसांची चार ते पाच पथके मुलीचा शोध घेण्यासाठी रवाना झाली आहेत. परिसरातील सर्व सीसीटीव्ही कॅमेरे व गुप्त माहिती दारांद्वारे या प्रकरणाचा शोध सध्या पोलीस यंत्रणा घेत असल्याची माहिती तपास अधिकारी व अंबड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अमोल गुरले यांनी दिली आहे.

### चोपडा तालुक्यात आर्थिक वर्षात अवैध गौण खनिज वाहतूक करणारी ३३ वाहन महसूल विभागाकडून जप्त



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी** : अवैध गौण खनिज वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी जिल्हाधिकारी व प्रांताधिकारी यांच्या आदेशान्वये २४ तास पथक कार्यान्वित करण्यात आले आहे. येत्या आर्थिक वर्षात ३३ अवैध गौण खनिज



वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात आलेली आहे. त्यापैकी पंधरा वाहनांनी आज अखेर २४ लाख रुपये दंड भरले आहे उर्वरित वाहनधारकांना नोटीस देण्यात आलेली आहे. त्यांनी दंड न भरल्यास त्यांच्या वाहनांचा लिलाव करून दंड वसूल करण्याची कारवाई करण्यात येणार आहे. दरवर्षी ३४ ते ३५ वाहनांवर कारवाई करण्यात येते अवैध गौण खनिज वाहतूक करणाऱ्यावर महसूल विभागामार्फत कारवाई करण्यात येत आहे. ज्या व्यक्तींना बांधकामासाठी गौण खनिज आवश्यक आहे अशा नागरिकांनी शासनाच्या लिलाव झालेल्या व्यक्तींकडून गौण खनिज खरेदी करावी मार्च महिन्यापर्यंत प्रत्यक्ष बांधकाम करणाऱ्यांच्या ठिकाणी जाऊन तपासणी करण्यात येणार असल्याचे तहसीलदार भाऊसाहेब थोरात यांनी सांगितले.

# लोकांच्या गरजा ओळखून उद्योग व्यवसाय करा

## मालवणी महोत्सवात माजी केंद्रीय मंत्री खा. नारायण राणे यांचा मराठी माणसाला सल्ला

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी** : लोकांच्या गरजा ओळखून उद्योग व्यवसाय करा, असा सल्ला माजी केंद्रीय मंत्री खासदार नारायण राणे यांनी मराठी माणसाला दिला आहे. मालवणी महोत्सवात आज ५ - २५ व्यावसायिक असतील पण भविष्यात यातुनच एखादा मोठा उद्योजक तयार होईल. असा आशावादही खा. राणे यांनी व्यक्त केला.

ठाण्यातील शिवाईनगर येथे सीताराम राणे यांच्या कोकण ग्रामविकास मंडळ आयोजित मालवणी महोत्सवाला बुधवारी (दि.१५ जाने.) कोकणचे भाग्यविधाते माजी केंद्रीय मंत्री खा. नारायण राणे यांनी भेट दिली. यावेळी व्यासपीठावर कोकण पदवीधर मतदार संघाचे आमदार ड. निरंजन डावखरे, आयोजक सीताराम राणे, परिवहन सदस्य विकास पाटील, संतोष राणे आदी उपस्थित होते.

खा. नारायण राणे यांनी कोकण ग्रामविकास मंडळा सारखी संस्था जन्माला घातल्याबद्दल सीताराम राणे यांना शुभेच्छा दिल्या. तसेच गेल्या २५ वर्षात मुंबई, पुण्यासह संपूर्ण महाराष्ट्रात असे अनेक मालवणी महोत्सव आता होत असुन मराठी माणूस उद्योगात येत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. देशाच्या विकासात महाराष्ट्राचा ३३ टक्के हिस्सा आहे, पण मराठी माणसाचा त्यात १ टक्काही हिस्सा नाही. तेव्हा, आज लोकांच्या नेमक्या काय गरजा आहेत हे ओळखून उद्योग व्यवसायात उतरा. असा सल्ला मराठी माणसाला दिला.

मालवणी महोत्सवात आज हे ५ - २५ व्यावसायिक असतील पण भविष्यात यातुनच एखादा मोठा उद्योजक होईल, तेव्हा जनतेने या उद्योजकांना प्रोत्साहन द्यावे. असे आवाहन त्यांनी केले.

देशाच्या विकासात महाराष्ट्राचा ३३ टक्के हिस्सा पण मराठी माणसाचा त्यातला १ टक्काही नाही. तेव्हा देशाच्या जीडीपीमध्ये मराठी माणसाची टक्केवारी वाढावी, हा हेतु असल्याचे खा. राणे म्हणाले. कोणता उद्योग किंवा व्यवसाय करावा यासाठी केंद्रात एमएसएमई मंत्री असताना जिल्हयाजिल्ह्यात ७२ अधिकारी मार्गदर्शन करण्यासाठी नेमले होते. याची आठवण करीत त्यांनी, यापुढेही मराठी माणसासाठी सातत्याने प्रयत्न करीत राहणार असल्याचा विश्वास व्यक्त केला.



### सिंधुदुर्गात डिस्ने लँड लवकरच...

सिंधुदुर्ग हा एकमेव पर्यटन जिल्हा म्हणुन मंजुर केल्यानंतर सिंधुदुर्गात विकास झाल्याचे सांगुन लवकरच सी वर्ल्ड आणायचय. सिंधुदुर्गात डिस्ने लँड आणायचे आहे, जागा मिळाली आहे दोन तीन खाजगी उद्योजकांशी बोललो आहे. रिलायन्सशी बोलणी झाली आहेत, काही तांत्रिक बाबीवर काम सुरू आहे. असे खा. नारायण राणे म्हणाले.



## विद्यार्थ्यांना आपत्कालीन परिस्थितीत काय करावे याबाबत दिले प्रशिक्षण; कल्याण अग्निशमन विभागाचा उपक्रम

**कल्याण/प्रतिनिधी** : कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या अग्निशमन विभागाकडून आपत्कालीन परिस्थितीत काय करावे यासाठी शाळकरी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण, प्रात्यक्षिके दाखवण्याचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. पंधरा दिवसातून एका शाळेतील विद्यार्थ्यांना अग्निशमन केंद्रात बोलावून ही माहिती दिली जाते. आपत्कालीन परिस्थितीत विद्यार्थ्यांनी घाबरून न जाता काय उपाययोजना कराव्यात याबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबवला जात असल्याचे अग्निशमन अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

## शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्य शासनाच्या क्रीडा विभागाद्वारे राज्यातील सर्वोत्कृष्ट क्रीडापटुंना व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा-या व्यक्तींना क्रीडा विभागाचा प्रतिष्ठेचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. या पुरस्कारासाठी सन २०२३-२०२४ करिता अर्ज करण्याचे आवाहन क्रीडा विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

अर्ज सादर करण्या-या इच्छुक क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू, साहसी उपक्रम व दिव्यांग खेळाडू यांनी विहित मुदतीत क्रीडा विभागाच्या http://sports.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर स्क्रोलिंग लिंक (ड्लीश्रश्रळपस डळपज्ञ) मध्ये उपलब्ध करुन दिलेल्या लिंकवर दि. १४ ते २६ जानेवारी, २०२५ या कालावधीत व दि. २६ जानेवारी, २०२५ रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्यात यावेत.

क्रीडा क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ज्येष्ठ क्रीडा महर्षीकरिता जीवन गौरव पुरस्कार, क्रीडा मार्गदर्शकांकरिता उत्कृष्ठ क्रीडा मार्गदर्शक / जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार (महिला क्रीडा मार्गदर्शक), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (साहसी उपक्रम), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (दिव्यांग खेळाडू) असे पुरस्कार प्रदान करण्यात येतात.

शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार सुधारीत नियमावली २०२३ विहित केली आहे. या नियमावलीनुसार सन २०२३-२४ या वर्षाच्या पुरस्कारासाठी राज्यातील क्रीडा मार्गदर्शक, खेळाडु, दिव्यांग खेळाडू व साहसी उपक्रमात सहभागी झालेले खेळाडू / व्यक्ती यांच्याद्वारा दि. १५ जानेवारी ते २६ जानेवारी, २०२५ ह्या कालावधीमध्ये ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत असल्याचे प्रसिद्धी पत्रकाद्वारे मुंबई उपनगरचे जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी कळविले आहे.

## आध्यात्मिक संस्कृतीचा पाया सेवाभाव हे प्रमाण मानून शासन कार्यरत - पंतप्रधान नरेंद्र मोदी

दैनिक आपला विदर्भ

**रायगड/प्रतिनिधी** : भारताची आध्यात्मिक संस्कृती अभ्यासकांना समाजाशी जोडते, करुणा वाढवते आणि त्यांना सेवेकडे नेते. खरी सेवा ही नि:स्वार्थी असते. आपल्या आध्यात्मिक संस्कृतीचा मुख्य पाया सेवाभाव असून आपले सरकार हाच सेवाभाव ठेवून काम करीत असल्याचे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज येथे केले.

भारताच्या सांस्कृतिक वारसाला चालना देण्याच्या वचनबद्धतेनुसार, पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांच्या हस्ते खारघर येथील श्री श्री राधा मदनमोहनजी मंदिर या इस्कॉन प्रकल्पाचे लोकार्पण झाले, त्यावेळी ते बोलत होते. नवी मुंबई मधील खारघर येथील नऊ एकर परिसरात वसलेल्या या प्रकल्पात अनेक देवदेवतांची मंदिरे, वैदिक शिक्षणाचे केंद्र, प्रस्तावित वस्तुसंग्रहालय, सभागृह, आणि उपचार केंद्र यांचा समावेश असून विश्र्वबंधुत्व, शांतता आणि सौहार्द वाढविणे, हे वैदिक शिक्षण केंद्राचे उद्दिष्ट आहे.

यावेळी व्यासपीठावर राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार हेमा मालिनी, इस्कॉन मंदिर मुख्य चिकित्सक सूरदास प्रभु उपस्थित होते. प्रधानमंत्री श्री.मोदी यांचे स्वागत मुख्य चिकित्सक सूरदास प्रभू आणि खासदार हेमामालिनी यांनी केले.

याप्रसंगी पंतप्रधान श्री.मोदी म्हणाले की, आपला भारत देश विलक्षण आणि अद्भुत भूमी असलेला आहे. देश केवळ भौगोलिक सीमांनी बांधलेला भूमीचा तुकडा नसून जिवंत संस्कृती आणि जिवंत भूमीचे प्रतीक आहे. आपल्या या संस्कृतीचे सार हे आध्यात्म आहे आणि भारताला समजून घेण्यासाठी आधी आध्यात्म स्वीकारले पाहिजे. जगाकडे केवळ भौतिक दृष्टीकोनातून पाहणारे भारताला विविध भाषा आणि प्रांतांचा संग्रह म्हणून पाहतात. जेव्हा कोणी त्यांचा आत्मा या सांस्कृतिक जाणिवेशी जोडतो तेव्हा त्यांना खऱ्या अर्थाने भारत दिसतो. संत ज्ञानेश्र्वरांनी ज्ञानेश्र्वरी गीतेद्वारे भगवान कृष्णाचे गहन ज्ञान उपलब्ध



करून दिले. त्याचप्रमाणे श्रील प्रभुपादांनी इस्कॉनच्या माध्यमातून गीता लोकप्रिय केली, भाष्य प्रकाशित केले आणि लोकांना तिच्या साराशी जोडले. वेगवेगळ्या ठिकाणी आणि काळात जन्मलेल्या या संतांनी प्रत्येकाने आपापल्या अनोख्या पद्धतीने कृष्णभक्तीचा प्रवाह पुढे नेला आहे. ते पुढे म्हणाले की, त्यांच्या जन्मकाळात, भाषांमध्ये आणि पद्धतींमध्ये फरक असूनही, त्यांची समज, विचार आणि जाणीव एक होती आणि या सर्वांनी भक्तीच्या प्रकाशाने समाजात नवीन चैतन्य, प्रेरणा दिली. नवी दिशा आणि ऊर्जा दिली.

भारताच्या अध्यात्मिक संस्कृतीचा पाया ही सेवा आहे, असे नमूद करून श्री.मोदी यांनी अध्यात्मात देवाची सेवा करणे आणि लोकांची सेवा करणे हे एक होते यावर भर दिला. भारताची आध्यात्मिक संस्कृती अभ्यासकांना समाजाशी जोडते, करुणा वाढवते आणि त्यांना सेवेकडे नेते. खरी सेवा ही नि:स्वार्थी असते असा श्रीकृष्णाच्या श्र्लोकाचा उल्लेख करून पंतप्रधानांनी सर्व धार्मिक ग्रंथ आणि धर्मग्रंथ सेवेच्या भावनेवर आधारित असल्याचे अधोरेखित केले. इस्कॉन ही एक विशाल संस्था शिक्षण, आरोग्य आणि पर्यावरणासाठी योगदान देत सेवेच्या या भावनेने कार्यरत आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. कुंभमेळ्यात इस्कॉन महत्त्वपूर्ण सेवा उपक्रम राबवित असल्याचे त्यांनी नमूद केले.

त्याच सेवेच्या भावनेने सरकार सातत्याने नागरिकांच्या कल्याणासाठी काम करीत असल्याबद्दल पंतप्रधानांनी समाधान व्यक्त केले. प्रत्येक घरात शौचालये बांधणे, उज्वला योजनेतून गरीब महिलांना गॅस कनेक्शन देणे, प्रत्येक घरात नळाला पाणी देणे, प्रत्येक गरीब व्यक्तीला ५ लाख रुपयांपर्यंत मोफत वैद्यकीय उपचार देणे, ७० वर्षांवरील प्रत्येक वृद्ध व्यक्तीला ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असल्याचे ही त्यांनी यावेळी अधोरेखित केले. वयानुसार, आणि प्रत्येक बेघर व्यक्तीला पक्की घरे उपलब्ध करून देणे या सर्व कृती या सेवेच्या भावनेने चालतात. सेवेची ही भावना खरा सामाजिक न्याय मिळवून देते आणि खऱ्या धर्मनिरपेक्षतेचे प्रतिक आहे, यावर पंतप्रधानांनी भर दिला.

कृष्णा सर्किटच्या माध्यमातून सरकार देशभरातील विविध तीर्थक्षेत्रे आणि धार्मिक स्थळांना जोडत आहे. हे सर्किट गुजरात, राजस्थान, हरियाणा, उत्तर प्रदेश आणि ओडिशापर्यंत विस्तारलेले आहे. स्वदेश दर्शन आणि प्रसाद योजनेंतर्गत या स्थळांचा विकास करण्यात येत असल्याचे सांगून त्यांनी कृष्णा सर्किटशी जोडलेल्या या श्रद्धा केंद्रांमध्ये भक्तांना आणण्यासाठी इस्कॉन मदत करू शकते, असे त्यांनी सुचविले. तसेच इस्कॉनला त्यांच्या केंद्रांशी संबंधित सर्व भाविकांना भारतातील अशा किमान पाच ठिकाणी भेट देण्यास प्रोत्साहित करण्याचे आवाहन केले.

ज्ञान आणि भक्तीच्या या महान धर्तीवर इस्कॉन मंदिराचे उद्घाटन होत आहे. श्री राधा मदनमोहनजी मंदिर संकुलाची रचना आणि संकल्पना अध्यात्म आणि ज्ञानाच्या संपूर्ण परंपरेचे प्रतिबिंबित करते. मंदिरात दिव्यत्वाची विविध रूपे दिसून येतात, जी 'एको अहं बहु स्यम' ही कल्पना व्यक्त करते. नवीन पिढीच्या आवडी आणि आकर्षणांना पूर्ण करण्यासाठी येथे रामायण आणि महाभारतावर आधारित संग्रहालय बांधले जात आहे. त्याचप्रमाणे वृंदावनच्या १२ वनांपासून प्रेरित एक बाग विकसित केली जात आहे. हे मंदिर भारताच्या चेतनेला श्रद्धेसह समृद्ध करणारे एक पवित्र केंद्र बनेल असा त्यांनी विश्र्वास व्यक्त केला. समाज जसजसा अधिक आधुनिक होत जातो तसतसा त्याला अधिक करुणा आणि संवेदनशीलतेची आवश्यकता असते. मानवी गुण आणि आपलेपणाची भावना असलेल्या संवेदनशील व्यक्तींचा समाज निर्माण करण्याची गरज आहे. इस्कॉन, त्यांच्या भक्ती वेदांताद्वारे जागतिक संवेदनशीलतेत नवीन जीवन फुंकू शकते आणि जगभरात मानवी मूल्यांचा विस्तार करू शकते, असे सांगून शेवटी पंतप्रधानांनी विश्र्वास व्यक्त केला की, इस्कॉनचे सदस्य श्रील प्रभुपाद स्वामींच्या आदर्शांचे पालन करीत राहतील.

# पाय निकामी, कंबरेतून वाहते युरीन तरीही नागपूरची अबोली बनली व्हीलचेअर मॉडेल

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी** : जगात असे अनेक प्रकारचे आजार आहेत. कर्करोग आणि टीबी सारखे आजार प्राणघातक आहेत, याशिवाय असे अनेक आजार आहेत जे खूप विचित्र आहेत आणि त्यांच्याबद्दल जाणून लोकांना आश्चर्य वाटते. असाच एक आजार म्हणजे रेनल रिक्ट्स, जो एक अतिशय दुर्मिळ आणि विचित्र आजार आहे आणि या आजाराची बळी एक भारतीय मुलगी आहे, जिला अनेकदा ६ वर्षांची मुलगी समजले जाते, परंतु जेव्हा लोकांना तिचे खरे वय कळते तेव्हा आपण अजूनही आश्चर्यचकित होतो. खरं तर, या आजाराने ग्रस्त असलेल्या लोकांच्या हाडांची वाढ नीट होत नाही. अशा परिस्थितीत, त्यांचे वय असूनही, ते अजूनही लहान मुलांसारखे दिसतात. या भारतीय मुलीचे नाव अबोली जरित आहे. ती महाराष्ट्रातील नागपूरची



रहिवासी आहे. तुम्हाला हे जाणून आश्र्चर्य वाटेल की अबोली २१ वर्षांची आहे आणि ती लवकरच २२ वर्षांची होणार आहे, पण तिला पाहून कोणीही म्हणू शकत नाही की ती इतकी वयस्कर आहे, उलट लोक तिला फक्त ६-७ वर्षांची मुलगी मानतात. अबोलीची उंची फक्त ३ फूट ४ इंच असल्याने, लोकांना खात्री आहे की ती अजूनही लहान आहे.

अबोली खूप लहान असताना तिची विचित्र स्थिती उघडकीस आली. सर्वात आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे तिचा जन्म मूत्राशया शिवाय झाला होता. यामुळे, त्याला सतत डायपर घालावे लागत होते, कारण त्याच्या शरीरातून सतत लघवी बाहेर पडत होती. खरं तर, मूत्राशयाचे काम मूत्र थांबवणे आणि ते एकाच ठिकाणी साठवणे आहे, परंतु जेव्हा मूत्राशय नसतो तेव्हा , हे स्पष्ट आहे की लघवी बाहेर येणार नाही. त्यामुळे तीचा वर शल्यकिर्या करून तिच्या शरीरातून बाहेर पडत राहते.

आता या विचित्र आजारामुळे अबोलीला शाळेच्या वेळेत खूप समस्यांना तोंड द्यावे लागत होते. अबोलीचे म्हणणे आहे की या आजारामुळे तिला दुसऱ्याच दिवशी शाळेतून काढून टाकण्यात आले होते, परंतु अबोलीच्या आत्याच्या मदतीने तिला प्रवेश मिळाला. दुसऱ्या शाळेतुन अबोलीने दहावीपर्यंत शिक्षण घेतले. त्यानंतर अबोलीला चालताही येत नव्हते कारण कालांतराने तिची हाडे खूप कमकुवत झाली होती. तथापि, असे असूनही, अबोलीने तिचे धैर्य गमावले नाही. तिने घरूनच शिक्षण घेऊन पदवी पूर्ण केली. गायिका आणि अभिनेत्री बनण्याचे तिचे स्वप्न असल्याचे अबोलीचे म्हणणे आहे. तिचे स्वप्न पूर्ण करण्याच्या प्रयत्नात, अबोलीने इंडियन आयडील मध्येही भाग घेतला. अबोलीने इंडियन व्हील-चेअर मॉडेलिंग स्पर्धेत ही पहिले पारितोषिक जिंकले आहे. सलमान खानच्या बिग बॉस शोमध्ये जाण्याचे अबोलीचे स्वप्न आहे. गायन आणि अभिनयाव्यतिरिक्त, अबोलीला राजकारणाचीही आवड आहे. तिचे स्वप्न देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, नागपूरच्या खासदार आणि केंद्रीय मंत्री गडकरी यांना भेटण्याचे आहे. अबोलीला राष्ट्रपती भवनालाही भेट द्यायची आहे.

अबोली एका मध्यमवर्गीय कुटुंबातून आहे, तिची आई एक नोकरदार महिला आहे आणि तिचे वडील तिची काळजी घेण्यासाठी दिवसभर घरीच राहतात, पण आज जेव्हा ते भूतकाळाबद्दल बोलतात तेव्हा त्यांना कधीच वाटले नव्हते की अबोली आज इतकी प्रसिद्ध होईल. त्याना अबोलीचे यश पाहून अभिमान वाटतो.

## विविध वृत्त...

### थकीत कर्जाचा एक रकमी भरणा केल्यास व्याजात मिळणार ५० टक्के सवलत

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** एक रकमी परतावा योजनेंतर्गत महामंडळाच्या लाभार्थींना थकीत कर्जाच्या व्याज दरात ५० टक्के सवलत मिळणार आहे. त्यामुळे लाभार्थ्यांनी एक रकमी परतावा दि. ३१ मार्च २०२५ पर्यंत करुन योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे वतीने करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य इतर मागास वर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या. मुंबई यांचे जिल्हा कार्यालय बुलढाणामार्फत विविध कर्ज योजनेंतर्गत जिल्हयातील इतर मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांना स्वयं रोजगाराकरीता अल्प व्याज दराने कर्ज वितरित केले आहे. परंतु काही लाभार्थ्यांकडून कर्ज थकीत असल्याचे निर्देशनात आले आहे. थकीत कर्ज प्रकरणात कर्ज वसुली व्हावी याकरीता संपूर्ण थकीत कर्ज रक्कमेचा एक रकमी भरणा करणाऱ्या लाभार्थ्यांना थकीत व्याज रक्कमेत ५० टक्के सवलत दिली जाणार आहे. तरी या एक रक्कमी परतावा योजनेचा लाभ घेऊन सर्व संबंधित लाभार्थ्यांनी थकीत मुद्दल व व्याज रक्कमेचा भरणा करण्यासाठी महाराष्ट्र राज्य इतर मागास वर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या., डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, चिखली येथे किंवा दुरध्वनी क्रमांक ०७२६२-२४८२८५ वर संपर्क करावा.

### बुलढाणा तालुक्यातील अवसायनातील १०३ संस्थांची नोंदणी रद्द होणार; आक्षेप नोंदविण्याचे सहायक निबंधकाचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा तालुक्यातील १०३ सहकारी संस्थाची नोंदणी रद्द करण्याची कार्यवाही सहायक निबंधक सहकारी संस्थाव्दारे करण्यात येत आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे नियम ८९(४) नुसार अवसायनातील संस्थाशी ज्या कोण्या व्यक्ती वा संस्थेविरुद्ध काही दावे असल्यास त्यांनी जाहिर सूचना प्रसिद्ध झाल्यचे तारखेपासून दोन महिन्याचे आत नोंदवावे लागणार आहे. त्यानंतर दाव्यांची दखल घेतली जाणार नाही, असे सहकारी संस्थाचे सहायक निबंधक गजानन आमले यांनी कळविले आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ नुसार सहकारी संस्था अंतिम अवसायनात घेण्यात अलेल्या अहेत. या संस्थावर अवसायकाची नियुक्ती यापुर्वीच करण्यात आलेली आहे. यापुढील दाखल केलेल्या दाव्याचे अनुषंगाने कोणत्याही दावा दाखल न झाल्यास त्यांनतर १०३ संस्थांची नोंदणी रद्द करण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

### सामाजिक संस्थाच्यावतीने महीला व बेरोजगारांसाठी रोजगार मेळाव्याचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा येथे सामाजिक संस्थेच्या वतीने महाराष्ट्रभर अनेक उद्योग व्यवसाय चे जाळे असणाऱ्या शिवउद्योग संघटनेच्या माद्यमातून रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे, दिवसेंदिवस वाढणारे बेरोजगारी, महागाई यामुळे जनता त्रस्त होत आहे. त्यामुळे बेरोजगार तसेच महिलांना आर्थिक सक्षम करण्यसाठी व स्वतः चा रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी दिनांक १९/०१/२०२५ रविवार रोजी बुलडाणा येथे कै.रा.दे.भोंडे.सरकार उच्च प्राथमिक शाळा क्र.६ मध्ये सकाळी १० वाजता रोजगार मेळावा पार पडणार आहे या रोजगार मेळाव्यामध्ये महिलांना स्थानिक व तालुका स्तरावर अपेक्षित रोजगार उपलब्ध करून देण्यात येणार असून, सामान्य माणसाच्या गरजेशी निगडीत अनेक सेवांची माहिती या वेळेस देण्यात येणार असून त्या त्त्या क्षेत्रात काम करण्याची संधी मिळणार आहे, या रोजगार मेळाव्यात जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे व या मेळाव्याचा लाभ घेण्याचे आव्हान श्रावस्ती बहु.विकास प्रबोधिनी संस्था, श्रीमत शिक्षण व ग्रामीण विकास बहु.संस्था. राजश्री छत्रपती शाहू व बहु संस्था यांनी केले आहे अधिक माहितीसाठी संपर्क :-८२०८४०७५०८ संदीप सुखधान, ९६०४४६९५६३ सतीश उबाळे,९१७५१२४११२ सचिन वायाळ ८६०५३५८९२० अजय जाधव यांच्याशी संपर्क साधावा.

### देवळी येथे महिला महाराष्ट्र केसरी लढत; २४ व २५ जानेवारीला रंगणार सामना

**वर्धा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने वर्धा जिल्हा कुस्तीगीर संघ व सार्वजनिक बजरंग व्यायाम शाळा, देवळी तर्फे महिला महाराष्ट्र केसरी लढत व वरीष्ठ महिला राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा देवळीच्या विदर्भ केसरी रामदास तडस इनडोअर स्टेडीयम येथे २४ व २५ जानेवारीला होणार आहे. या स्पर्धेचे उदिघाटन आदिवासी विकासमंत्री अशोक उईके यांच्या हस्ते व माजी खासदार नवनीत राणा यांच्या उपस्थितीत होणार आहे. या स्पर्धेत राज्याच्या ३६ जिल्ह्यातून ५१ संघ सहभागी होणार आहे. २५ जानेवारी स्पर्धेच्या समारोपाला महाराष्ट्राचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. या स्पर्धेचा सर्वांनी लाभ घ्यावा असं आवाहन कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष तथा माजी खासदार रामदास तडस यांनी केला आहे.

# ई-महसूल प्रणालीचे क्यूआर कोड वापरुन ऑनलाईन सुविधांचा लाभ घ्यावा !

## जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हाधिकारी कार्यालय,बुलढाणा मार्फत जिल्ह्यातील सर्व शेतकरी व नागरिकांना ई महसूल प्रणाली अंतर्गत ानलाईन सेवांच्या विविध ई प्रणालीचे एकत्रित क्यूआर कोड (ट्ठ लेवश) उपलब्ध केले आहेत. हे क्यूआर कोड शेतकरी, नागरिकांनी मोबाइल फोनद्वारे स्कॅन करून लिंकवर क्लिक करावे आणि ई महसूल प्रणालीअंतर्गत सुविधांचा लाभ घ्यावा,असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी केले आहे.

या ई-महसूल प्रणालीमधील ई हक्क, ई चावडी नागरिक पोर्टल, ई रेकॉर्डस, ई नकाशा, भुलेख, ई फेरफार या ानलाईन सेवा नागरिकांसाठी उपलब्ध करण्यात आल्या आहेत.



ई हक्क प्रणालीद्वारे सातबाऱ्यावरील ईकरार नोंद, बोजा कमी करणे, बोजा नोंद घेणे,गहाणखत, मयत कुळ वारस, नाव कमी करणे,७/१२ दुरुस्तीची नोंद करण्यासाठी ऑनलाइन अर्ज करता येतो. ई चावडी पोर्टलद्वारे जमीन महसूल कर पावती पाहता येते. ई रेकॉर्ड्स प्रणालीद्वारे जुना सातबारा, फेरफार, पेरेपत्रक पाहता येतात. ई नकाशा प्रणालीद्वारे शेत जमिनीचा नकाशा पाहता येतो. भुलेख प्रणालीद्वारे ानलाईन सातबारा उतारा, मालमत्ता पत्रक, ८ अ उतारा पाहता येतो. आपली चावडी डिजिटल नोटीस बोर्डच्या क्यूआर कोडद्वारे फेरफार नोटीस, मोजणी नोटीस पाहता येते. याशिवाय डिजिटल स्वाक्षरीतील सातबारा उतारा, मालमत्ता पत्रक, ८अ उतारा डाऊनलोडसुद्धा करता येणार आहे तसेच महाराष्ट्र शासनाचे सर्व शासन निर्णय पाहता येतील.

जिल्ह्यातील सर्व शेतकरी, नागरिकांसाठी या डिजिटल ई महसूल प्रणाली सुविधा जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सर्व तलाठी कार्यालय,मंडळ अधिकारी कार्यालय,सर्व तहसीलदार कार्यालय,सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालयात उपलब्ध करण्यात आल्या आहेत. या ई-प्रणाली सुविधेचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी केले आहे.




# समृद्धी महामार्गावर ट्रक आणि ट्रॅव्हल्सचा भीषण अपघात





दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** मंगरूळ दस्तगीर पोलीस स्टेशन हद्दीत आष्टा नजीक समृद्धी महामार्गावर ट्रॅव्हल्स आणि ट्रकचा भीषण अपघात झाला आहे. या अपघातामध्ये ट्रॅव्हल्स चालक हा जागीच ठार झाला असून १५ ते १६ प्रवासी जखमी झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे. पुणे वरून नागपूर जाणारी ही ट्रॅव्हल्स होती. यामध्ये अंदाजे ३० च्या जवळपास प्रवासी प्रवास करीत होते. घटनेची माहिती मिळताच दत्तापूर पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी तसेच मंगरूळ दस्तगीर पोलीस स्टेशनचे कर्मचारी व वाहतूक पोलीस आणि एमएसआरडीची रेस्क्यू टीम त्याठिकाणी दाखल झाले व त्यांनी जखमींना तात्काळ ग्रामीण रुग्णालय धामणगाव रेल्वे येथे उपचारासाठी पाठवले तर काहींना पुलगाव पाठविण्यात आले आहे.

### उपसंचालक अनिल आलूरकर यांना मातृशोक

**नांदेड/प्रतिनिधी :** नांदेड येथील मूळ निवासी असणारे व माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे अमरावती येथील उपसंचालक अनिल आलूरकर यांच्या मातोश्री श्रीमती वनमाला लालोजीराव आलूरकर यांचे वयाच्या ८० व्या वर्षी अल्पशा आजाराने अमरावती येथे आज निधन झाले.



श्रीमती वनमाला लालोजीराव आलूरकर यांच्यावर आज बुधवारी १५ जानेवारी रोजी नांदेड येथील गोवर्धन घाटावर सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. श्रीमती वनमाला लालोजीराव आलूरकर यांच्या पश्र्चात महानगरपालिकेतील अधिकारी श्री पवनकुमार आलूरकर, उपसंचालक अनिलकुमार आलूरकर, बँकेचे अधिकारी प्रसाद आलूरकर ही तीन मुले व मुलगी श्रीमती अलका माधवराव चुकेवाड असा बराच मोठा आप्तपरिवार आहे.

# पिंपळनेर पानखेडे येथे उसळला लाखो आदिवासी बांधवांचा महाकुंभ

दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** धुळे जिल्ह्यातील पिंपळनेर पानखेडा ३२ व्या जागतिक आदिवासी महासंमेलनासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून आदिवासी बांधव धुळे जिल्ह्यातील पिंपळनेर येथे आलेले असून आज सकाळी आदिवासी संस्कृतीचे प्रदर्शन करीत रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये विविध देखावे नृत्य सादर करत रॅली सभास्थळी दाखल झाली त्यानंतर आदिवासी पद्धतीने कार्यक्रमाचे उद्घाटन झाले.



या संमेलनात दहा लाखापेक्षा जास्त आदिवासी बांधव महासंमेलन स्थळी उपस्थित असून आसाम, अरुणाचल प्रदेश, गुजरात मध्य प्रदेश ,राजस्थान छत्तीसगड, उत्तर प्रदेश अशा अनेक राज्यातून आदिवासी बांधव उपस्थित आहेत. आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडवणारे विविध स्टॉल महासंमेलन स्थळी उभारण्यात आले असून ठीक ठिकाणी आदिवासी नृत्य सादर केले जात आहे. आसाम येथून तीन सुखिया झिरटा येथून ज्योतिर्गो हाहीन मोरान ट्राय चे आदिवासी बांधवांनी बांबूपासून झोपडी बनवलेली होती अरुणाचल प्रदेश येथूनही मोडणार टाईपच्या हरेली जा या आदिवासी महिला उपस्थित होते त्यांनी असामी नृत्य मोरान भिऊ सादर करीत संमेलन स्थळी आलेल्या प्रेक्षकांची मने जिंकली. या सर्व स्टॉलची व्यवस्था गुजरात व्यारा येथील उत्पल चौधरी गुजरात यांनी केलेली होती. यावेळी आदिवासींनी बनवलेल्या विविध वस्तूंचे अनेक राज्यातील स्टॉल विक्री व प्रदर्शनासाठी ठेवण्यात आलेले होते.

## हदगाव आगाराची ढाणकी मार्ग हिमायतनगर ते उमरखेड बस सुरु



दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** माधवराव मिटकरे प्रवाशी मंडळ च्या प्रयत्नाने आज दिनांक १५ जानेवारी ला ढाणकी मार्ग हिमायतनगर ते उमरखेड बस सुरु झाली आहे. ही बस सुरु झाल्यामुळे या मार्गातील प्रवासी खुश झाले असून त्यांनी माधवराव मिटकरे प्रवाशी मंडळाचे आभार मानत आहे. हदगाव आगाराची बस ढाणकी येथे पोहचताच माधवराव मिटकरे प्रवाशी मंडळ यांनी एस. पी. इंगोले व डी. के. कदम यांचे साल व पुष्प गुच्छ देऊन स्वागत केले.तसेच या मार्ग बस सेवा सुरु केल्यामुळे विभाग नियंत्रक नांदेड वळसकर ,आगार व्यवस्थापक अरविंद धर्माधिकारी व टी. आय निवडंगे व हिमायतनगर वाहतुक नियंत्रक सोपन साखरे,यांचे आभार मानले. खा.नागेश पाटील यांनी वरीष्ठानां पत्र दिले होते यावेळी युवा ग्रामीणचे उपाध्यक्ष करण भरणे, सचिव अशोक गायकवाड, आजीम खां,महेबूब शेख, मिलिंद चिकाटे,माधवराव मिटकरे प्रवाशी मंडळ अध्यक्ष इरफान शेख, सचिव हिरासिंग चव्हाण, कार्याध्यक्ष नाथा पाटील, आणि उपाध्यक्ष शैलेश साखरे , मुलं निवासी , कार्यकर्ते शेख जब्बार ,उपस्थित होते.

# रस्ता सुरक्षा संदर्भात जनजागृती करा - जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** वाहन चालविताना हेल्मेटचा वापर करणे हे रस्ता सुरक्षतेच्या दृष्टीने अंत्यत महत्वाचे असून रस्ते अपघातात जखमी व मृत्यू होण्याचे प्रमाण दुचाकी वाहनाचे सर्वाधिक आहे. प्रामुख्याने हेल्मेट घातलेले नसल्यामुळे मृत्यूचे प्रमाण अधिक असल्याने रस्ता सुरक्षा संदर्भात व्यापक जनजागृती करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी यावेळी केले.



रस्ता सुरक्षा समिती, व पोलीस विभाग व उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे हेल्मेट जनजागृती अभियानानिमित्त शहरातून हेल्मेट रॅली काढण्यात आली. या हेल्मेट रॅलीला जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी हिरवी झेंडी दाखवून रवाना केली. यावेळी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ज्ञानेश्र्वर हिरडे, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी नागनाथ महाजन, सहायक पोलीस निरिक्षक आशिष रोही उपस्थित होते.



जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी सेल्फी पाईटवर फोटो काढून हेल्मेट घालूनच प्रवास करण्याचे आवाहन उपस्थितांना केले. हेल्मेट रॅलीची सुरुवात जिल्हाधिकारी कार्यालय येथून सुरु होऊन जयस्तंभ चौक, धाड नाका, सर्कुलर रोड, भोडे चौक, बाजार लाईन मार्गे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे रॅलीचा समारोप झाला. या रॅलीमध्ये पोलिस विभाग, नगरपरिषद व परिवहन विभागाचे अधिकारी, कर्मचारी, वाहन वितरक प्रतिनिधी सहभागी झाले होते. यावेळी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी नागरिक व कर्मचाऱ्यांना रस्ता सुरक्षासंदर्भात प्रबोधन केले.